दैनिक

# मराठवाडा पत्र

बीड । शुक्रवार
१७.१.२०२५
वर्षे : ४ अंक : २८१
किंमत : ३ रू. पाने : ४

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955





आज संकष्ट चतुर्थी
चंद्रोदय रात्री ९:३२

# कोणते जिल्हे कुणाच्या ओटीत?

## सोमवारी उघडणार पालकमंत्री पदाचा पिटारा

बीड, (प्रतिनिधी):-बहुमती सरकारच्या बहुरंगी तिढ्याची शृंखला कायम असताना पैकी एक सोमवारी सुटेल असे बोलले जाते आहे, कोणता जिल्हा कोणत्या मंत्र्याला यावर तिसऱ्या सोमवारी सुटेल असा कयास आहे. पालकमंत्रिपदांच्या वाटपाबद्दल एक महत्वाची अपडेट समोर येत आहे. येत्या दोन दिवसात महायुतीची बैठक होणार असून बैठकीत पालकमंत्र्यांची नावे निश्चित केली जाणार आहेत. सोमवारी स्वत: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पालकमंत्रिपदांचे वाटप जाहीर करणार असल्याची माहिती विश्वसनीय सुत्रांकडून देण्यात आली आहे.ङ्गराज्य मंत्रिमंडळाचा विस्तार होऊन महिना उलटून गेल्यानंतरही महायुती सरकारकडून पालकमंत्रिपदाचे वाटप केले गेले नव्हते. विरोधकांकडून या दिरंगाईबद्दल सरकारवर टीका केली जात होती. तीनही पक्षांमध्ये पालकमंत्रिपदावरून जोरदार रस्सीखेच सुरू असल्याच्या चर्चा केल्या जात होत्या. अनेक जिल्ह्यात पालकमंत्रि पदाकरिता तीनही पक्षातील मंत्र्यांनी दावेदारी केल्याने तिढा निर्माण झाला होता असे बोलले जात आहे.या संदर्भात बैठक घेऊन पालकमंत्रिपदाबाबत अंतिम चर्चा करून नावे निश्चित करण्याचे महायुतीने ठरविले आहे. मुख्यमंत्री स्वत: ही नावे जाहीर करणार आहेत. पुढील आठवड्यात प्रजासत्ताक दिन आहे. या दिवशी जिल्ह्या मुख्यालयात पालक मंत्र्यांच्या हस्ते ध्वजवंदन केले जाते. त्यामुळे सरकारकडून पालकमंत्री पदाची नावे पुढील काही दिवसात जाहीर होणे आवश्यक आहे.



### डीएम का बारामतीचे भीम?

धनंजय मुंडे राष्ट्रवादीचे वजीर महाराष्ट्रात तिसऱ्या मताधिक्याने निवडून आलेले मंत्री झाले आणि संतोष देशमुख हत्या प्रकरणी त्यांना पक्ष व महायुती मधील स्पर्धकाकडून राजकारण झाले आणि पालकमंत्रीपद प्रलंबित झाले. राजकीय प्रेशर मेंटेन करून फडणवीस सरकार स्वतःच्या मित्रांना मर्यादित करण्याचे राजकारण करतात असे बोलले जात आहे. अश्या पेचात बीडचे पालकत्व कुणाला अजित राहणार याकडे लक्ष लागले आहे.

### बीडबाबत तिढा

धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे हे बीड जिल्ह्यातून पालकमंत्री पदाचे प्रबळ दावेदार आहेत. मात्र संतोष देशमुख हत्याप्रकरणी धनंजय मुंडें यांच्या मंत्रीपदाच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. तसेच बीडमधील हत्याप्रकरणानंतर मुख्यमंत्र्यांनीच पालकमंत्रीपद स्वीकारावे अशी मागणीही केली जात आहे. त्यामुळे पालकमंत्री पदाबाबत सरकारच्या भूमिकेकडे सर्वांचेच लक्ष असेल.

## धनंजय मुंडेंचा परळीत जनता संवाद

परळी वैद्यनाथ (दि. १६) - नियमित प्रमाणे परळीत आल्यानंतर आज राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे यांनी परळी येथील आपल्या जगमित्र या कार्यालयामध्ये बसून मतदारसंघातून व मतदारसंघ बाहेरून आलेल्या नागरिक कार्यकर्ते तसेच पदाधिकारी यांच्याशी संवाद साधत त्यांची कामे अडचणी समजून घेतल्या तसेच ती मार्गी लावण्याबाबत संबंधितांना योग्य त्या सूचना देत संबंधितांची कामे मार्गी लावली. जागच्याजागीच काम मार्गी लावण्याचा शैलीमुळे धनंजय मुंडे यांच्या जनता संवाद उपक्रमास नेहमीच गजबजलेली गर्दी पाहायला मिळते. आजही धनंजय मुंडे जगमित्र कार्यालयात दाखल झाल्यानंतर पदाधिकारी कार्यकर्ते त्याचबरोबर परळी व परळी बाहेरील नागरिकांनी जगमित्र हे धनंजय मुंडे यांचे कार्यालय गजबजलेले पाहायला मिळाले. ङ्गङ्गमंत्री धनंजय मुंडे हे परळीत असल्यानंतर नियमित प्रभू वैद्यनाथांच्या दर्शनाला ▶▶पान २ वर

### जगमित्र कार्यालय गजबजले



## वाल्मिक कराडच्या अडचणी वाढणार

मुंबई, (वृत्तसेवा):-बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी वाल्मिक कराड याच्यावर मोक्का अंतगर्त कारवाई करण्यात आली आहे. या हत्या प्रकरणात वाल्मिक कराड याचं नाव आल्यामुळे धनंजय मुंडे यांच्या अडचणीही वाढल्या आहेत. एवढच नाही तर धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणीही केली जात आहे. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणीवर भाजप आमदार सुरेश धस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरण सुरेश धस यांनी लावून धरलं आहे. आज संध्याकाळी उज्वल निकम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटतील. दाओसला जाण्याआधी मुख्यमंत्री उज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करतील, असं सुरेश धस यांनी सांगितलं आहे. तसंच धनंजय मुंडे यांचा राजीनामा हा राष्ट्रवादी काँग्रेसचा अंतर्गत प्रश्न आहे, ▶▶पान २ वर



### मुख्यमंत्री कोणता कठोर निर्णय घेणार? सुरेश धसनी थेट सांगितलं

### वाल्मिकची पत्नी माझी भगिनी-धस

दरम्यान वाल्मिक कराडच्या पत्नीने केलेल्या आरोपांवर प्रतिक्रिया द्यायला सुरेश धस यांनी नकार दिला आहे. वाल्मिकची पत्नी माझी भगिनी आहे, माझ्या भगिनीने केलेल्या आरोपावर मी काहीही बोलणार नाही. पुरुषांनी माझ्यावर आरोप करावे, तर मी उत्तर देईन. मी धुतल्या तांदळासारखा आहे, माझे कुठलेही व्हिडिओ सापडणार नाही, असं सुरेश धस म्हणाले आहेत.

## पंचायत समिती वैयक्तिक लाभाच्या योजना सुरू करा

### सरपंच,उपसरपंच,कर्मचाऱ्यांचे मानधन द्या-गुंदेकर



बीड, (प्रतिनिधी):-पंचायत समिती अंतर्गत व्यक्तिगत लाभाच्या योजना मोठ्या प्रमाणात राबविल्या जातात. ज्यामध्ये घरकुल, शेतीसंबंधी फळबाग, विहीर, गायगोठा यांचा समावेश असून गावच्या सार्वजनिक अन्? व्यक्तिगत गावकऱ्यांच्या विकासासाठी या योजना महत्वाच्या असतात. गेल्या काही महिन्यांपासून बीड पंचायत समिती अंतर्गत वैयक्तिक व सार्वजनिक लाभाच्या योजनांच्या मागण्या व इतर बाबतीत कसलीच कार्यतत्परता दाखवली जात नाही. यासोबतच सरपंच, उपसरपंच, कर्मचाऱ्यांचे मानधन देखील थकीत आहे. सामाजिक अंकेक्षणच्या नावाखाली अख्ख्या तालुक्यातील सगळेच मंडळ निहाय कामे बंद ठेवणे हिताचे नसून ढेपाळलेला कारभार सुरळीत व्हावा, रोहयो अंतर्गत व्यक्तिगत लाभाच्या योजनांच्या मागण्या, कुशल बाबत कार्यवाही व्हावी. तसेच सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत कर्मचारी यांचे थकीत मानधन तत्काळ वर्ग करावे अशी ▶▶पान २ वर

### मोदी सरकारचं मोठं गिफ्ट...

## सरकारी कर्मचाऱ्यांना आठवा वेतन आयोग लागू होणार

नवी दिल्ली, (वृत्तसेवा):-नव्या वर्षात पीएम नरेंद्र मोदी यांनी सरकारी कर्मचाऱ्यांना खास गिफ्ट दिलं आहे. केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. आठवा वेतन आयोग लागू होणार आहे. गेल्या काही दिवसांपासून आठव्या वेतन आयोगावर उलट सुलट चर्चा सुरू होत्या. आठवा वेतन आयोग लागू होणार नाही अशीही एक चर्चा होती, आता चर्चांना पूर्णविराम मिळाला आहे. आठव्या वेतन आयोगाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अश्विन वैष्णव यांनी पत्रकारांना ही माहिती दिली. केंद्रीय कर्मचारी बऱ्याच काळापासून आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेची मागणी करत होते. जेव्हा केंद्रीय कर्मचारी आणि पेन्शनधारकांचा महागाई भत्ता ५३ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. केंद्रीय कर्मचारी ▶▶पान २ वर

## पतंग उडवताना नायलॉन मांजा टाळा

### जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अशोक थोरात यांचे आवाहन



बीड, (प्रतिनिधी):-पतंग उडवताना नायलॉन मांजाचा वापर टाळा. नायलॉन मांजा दुसऱ्याचा जीव घेऊ शकतो, पतंग उडवताना काळजी घ्या असे आवाहन बीडचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी केले आहे. बीड शहरातील सावता माळी चौकात एका दुचाकीस्वाराच्या गळ्याला नायलॉन मांजा अडकल्याने तो जखमी झाला. सुदैवाने त्याच्या लक्षात आल्याने दुर्घटना टळली आणि तो बाल बाल बचावला. मात्र त्याच्या गळ्याला आणि हाताला जखम झाली आहे. बीड शहरात आणि ▶▶पान २ वर

### लाडक्या बहिणीचा जानेवारीचा हफ्ता मिळण्याची तारीख ठरली

## 'या' दिवशी १५०० रुपये खात्यावर जमा होणार

मुंबई, (वृत्तसेवा):- लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर येत असून जानेवारी महिन्याचा हफ्ता मिळण्याची तारीख समोर आली आहे. लाडक्या बहिणींना २६ जानेवारी रोजी या महिन्याचा हफ्ता मिळणार असल्याचं राज्याच्या मंत्री आदिती तटकरे यांनी जाहीर केलं आहे. या संबंधी माहिती देताना आदिती तटकरे म्हणाल्या की, ''२६ जानेवारीच्या आधी जानेवारी महिन्याचा लाभ मिळेल असा प्रयत्न सुरू आहे. यासाठी ३,६९०




कोटींचा निधी आम्हाला मिळणार आहे. अर्थसंकल्पाच्यावेळी देखील महिलांना लाभ कसा मिळेल याची तरतूद आम्ही करणार आहोत. ▶▶पान २ वर

## बीडसह मराठवाड्यात एवढे गावठी कट्टे कुठून येतात? त्याच्या तस्करीचा मार्ग कोणता?

बीड, (प्रतिनिधी) : संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर बीड जिल्हा चर्चेत आला आहे. पण जेवढी चर्चा या बीड जिल्ह्याची आहे तेवढीच चर्चा या बीड जिल्ह्यातील पिस्तुल आणि गावठी कट्ट्यांची आहे. फक्त बीडच नव्हे तर मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये गेल्या काही वर्षांत गावठी कट्ट्यांची विक्री वाढली आहे. ▶▶पान २ वर

### कोणत्या जिल्ह्यात किती जणांवर कारवाई?

* छत्रपती संभाजीनगर ग्रामीण : ०७ * बीड : २६ गावठी कट्टे कारवाई * धाराशिव : १३ गावठी कट्टे कारवाई * जालना : १६ गावठी कट्टे कारवाई * नांदेड : ४४ गावठी कट्टे कारवाई * लातूर : ८ गावठी कट्टे कारवाई * हिंगोली : ११ गावठी कट्टे कारवाई * परभणी : ०६





# कूच बिहार!



बिहार, उत्तर प्रदेश वा तत्सम प्रदेशात कार्यालयीन वा अन्य कारणांसाठी वास्तव्य वा प्रवासाचा अनुभव असलेल्यांस ही बाब तत्क्षणी पटेल. त्या प्रांतात माणसे एकमेकांस ''आप कौन जाती के'' असे सहज विचारतात आणि कायस्थ, भूमिहार, पंडित, चमार अशी आपली ओळख करून देणे कोणास कमीपणाचे वाटत नाही. विद्यामान महाराष्ट्र त्या दिशेने वाटचाल करू लागला आहे किंवा काय, असा प्रश्न पडतो. तो पडण्याचे निमित्त कोणा वाल्मीक कराड नामे स्थानिक गावगुंडावरील कारवाई आणि त्यानंतर उद्भवलेली परिस्थिती. या संदर्भात आणि त्यानिमित्ताने बदलत्या महाराष्ट्राबाबत भाष्य करताना एक बाब स्वच्छ मान्य करणे गरजेचे आहे. ती म्हणजे एखादी व्यक्ती समाज वा इतरांसाठी कितीही गुंड, दुर्जन आदी असली तरी त्या व्यक्तीच्या कुटुंबीयांसाठी ती कर्ती आणि कर्तृत्ववान अशी असते. त्यामुळे कारवाईनंतर या कराड याच्या मातोश्री वा पत्नी यांचा भावनोद्रेक समजून घेता येईल. त्याच्या मातोश्रींसाठी वाल्मीक हा श्रावणबाळ असू शकतो आणि पत्नीसाठी आदर्श पती. त्याबाबत कोणाची हरकत असण्याचे कारण नाही. तथापि त्याची पत्नी वाल्मीकवरील कारवाईसाठी जेव्हा जातीचा मुद्दा मांडते त्या वेळी तो विषय कुटुंबापुरता मर्यादित राहात नाही. तो प्रश्न सामाजिक होतो. 'वंजारी म्हणून आमच्यावर कारवाई' असा काहीसा सूर वाल्मीकच्या पत्नीचा होता. तो तसाच स्वीकारला गेल्यास प्रत्येक आरोपीचे आप्तेष्ट असा युक्तिवाद करू शकतील आणि तसे झाल्यास अट्टल गुन्हेगाराच्या कुटुंबीयांसही 'आम्ही अमुक जातीचे/ धर्माचे/ पंथाचे आहोत म्हणून ही कारवाई' असे म्हणण्याची सोय राहील. असे होणे म्हणजे कायद्याचे राज्य ही संकल्पना मोडून पडणे. जन्माला आलेली प्रत्येक व्यक्ती काही तरी सामाजिक ओळख जन्मत:च घेऊन येते. ही जन्मखूण हा काही कारवाईचा वा ती न करण्याचा मापदंड प्रगत समाजात असू शकत नाही. त्यामुळे या कराडवरील कारवाई आणि जातीचे राजकारण हा मुद्दा दखलपात्र होतो. तथापि ही बाब केवळ या वाल्मीकच्या कुटुंबीयांपुरती मर्यादित नाही. ती अधिक व्यापक आहे. आणि त्यामागील कारण म्हणजे या वाल्मीकच्या चौकशी अधिकाऱ्यांची निघालेली जात. या चौकशी पथकातील काही अधिकारी वाल्मीकचे निकटवर्तीय होते/ आहेत इतक्यापुरतीच ती मर्यादित राहिली असती तर कोणास आक्षेप घेण्याची गरज नव्हती. वास्तव तसे नाही. या पथकातील काही अधिकारी वाल्मीकप्रमाणे वंजारी आहेत आणि त्यामुळे त्यास जवळचे आहेत असे आरोप झाले. ते नाकारले गेले नाहीत. पण त्यानंतर सरकारला चौकशी पथकातील काही अधिकाऱ्यांस बदलावे लागले. हे असे करावे लागणे ही बाब केवळ नामुष्कीपुरतीच मर्यादित नाही. तर हे जातीचे वास्तव त्यामुळे मान्य करावे लागले ही यातील महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यातील लाजिरवाणी बाब. वाल्मीक कराड आणि त्याचे कथित बोलवते धनी धनंजय मुंडे हे दोघेही वंजारी. या दोघांना ज्यांनी लक्ष्य केले ते भाजपचे सुरेश धस हे मराठा. तसेच या प्रकरणी मारले गेले ते संतोष देशमुख हेही मराठा. आता मराठा धस यांनी मराठा देशमुखांच्या हत्येस वाचा फोडण्यासाठी हे प्रकरण लावून धरले की त्यांचे कथित मारेकरी हे वंजारी आहेत म्हणून यावर बोंब ठोकली याचे प्रामाणिक उत्तर कधीच मिळणार नाही. मिळाले तरी ते प्रामाणिक आहे असे कोणी म्हणणार नाही. अशा वेळी प्रश्न इतकाच असायला हवा : मराठा धस यांनी वंजारी कराड याच्यावर केलेले आरोप खरे आहेत की नाही? खरे असले तर अन्य मागास समाजातील व्यक्तीवर कथित पुढारलेल्या समाजातील व्यक्तीने ते केले या जातीच्या कारणाने त्याकडे दुर्लक्ष करणार का? आणि नसले तर आरोप करणारा पुढारलेल्या समाजाचा आहे म्हणून त्याकडे काणाडोळा करणार का? कोणत्याही प्रगतिशील समाजात या प्रश्नांची उत्तरे अगदी बालबुद्धीही देऊ शकतील. पण आपल्याकडे नाही. याचे कारण गेली काही वर्षे सडत चाललेले आपले सामाजिक जीवन. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाले की एकीकडे व्हॉट्सॲप विद्यापीठात 'पेशवाई' आल्याचे संदेश फिरतात आणि दुसरीकडे मराठा आरक्षणाची मागणी उचल खाते; तर मुख्यमंत्रीपदी मराठा व्यक्ती आल्या आल्या एका जिल्ह्यापुरतीही ओळख नसलेली व्यक्ती रातोरात राज्यस्तरीय होते हे याच सडलेपणाचे लक्षण. ऐन निवडणुकांच्या तोंडावर मराठा आरक्षणाचा न्यायालयात न टिकणारा आदेश याच हिशेबाने काढला जातो. मग हा तापलेला मराठा मुद्दा निष्प्रभ करण्यासाठी राज्यभर 'ओबीसी' मेळावे घेतले जातात आणि या ओबीसींना जवळ करण्याच्या प्रतीकात्मकतेतूनच धनंजय मुंडे यांची सर्व कृत्ये पोटात घातली जातात. संजय राठोड यांच्या सर्व कृत्यांकडे डोळेझाक करून त्यांना मंत्रिमंडळात घेतले जाते ते याच जात या कारणाने आणि त्याच कारणामुळे भाजपतील नैतिक रणरागिण्या राठोड यांस गोड मानून घेतात. छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात न घेणे हा समस्त 'ओबीसीं'वर अन्याय कसा याचे उत्तर याच जात या कारणाने मिळत नाही आणि विदूषकी रामदास आठवले यांस कोपऱ्यातले का असेना मंत्रीपद देणे म्हणजे दलितांस न्याय कसा हा प्रश्न विचारला जात नाही. येथे कोणा एका पक्षास वा नेत्यांस दोष देण्याचा उद्देश नाही. तसे करताही येणार नाही. कारण एक बाळासाहेब ठाकरे यांचा अपवाद वगळता सर्व पक्ष आणि नेत्यांचे राजकारण म्हणजे जात ठिपक्यांच्या रांगोळ्या! सर्वच पक्ष यात दोषी. हे सर्व राजकारणापुरते होते तेथपर्यंत ठीक. तथापि हे सर्व आता प्रशासन आणि पोलीस दलापर्यंत मुरत गेले असून बहुतांशांचे विचार आणि आचार आता जातीच्या अंगानेच होऊ लागले आहेत. ज्या शहराविषयी जेथे जात पाहिली जात नाही असे गौरवोद्गार काढले जात होते त्या मुंबई शहरातील मंत्रालय या राज्य सरकारच्या मुख्यालयात आता जातीचे हिशेब खुलेआम मांडले जातात. मंत्री आपापल्या सगेसोयऱ्यांची वर्णी लावतात आणि हे सगेसोयरे अधिक 'आपले' कोण याच विचाराने प्रशासन चालवतात. इतकेच काय तर हे विष आता माध्यमांपर्यंत मुरू लागले असून सरकारी उच्चपदस्थ वर्ग 'आपल्या जातीच्या' माध्यमकर्मीस जवळ करून बातम्या पेरणे आणि इतरांस दूर राखणे सर्रास करू लागला आहे. हे सर्व नमूद करताना पूर्वी सर्व आदर्श होते आणि आताच या कुप्रथा बोकाळू लागल्या आहेत असे अजिबात नाही. भारतात जात हा घटक होताच. त्यावर मात करून राजकीय यश संपादन करण्यासाठी धर्म हा मुद्दा पुढे केला गेला आणि आता वाढत्या धर्मप्रभावास रोखण्यासाठी पुन्हा जात असा हा प्रवास आहे. एक व्यसन टाळण्यासाठी दुसऱ्याचा आधार घ्यावा तर त्याचेही व्यसन लागावे, तसे हे. शहाण्या व्यक्ती अशा वेळी व्यसनमुक्ती केंद्राचा आधार घेतात. महाराष्ट्रात अद्यापही राजकीय शहाणपण शिल्लक असेल तर राजकीय धुरीणांनी असा काही आधार शोधायला हवा. प्रशासन, पोलीस यांच्यानंतर पुढचा टप्पा न्यायपालिका आणि लष्कर असा असेल. व्यक्ती वा समाज किती उंच कर्तृत्वाचे शिखर गाठतात, यास मर्यादा असू शकतात. पण मूर्खपणाच्या नीचांकास अंत नसतो. हे लक्षात घेऊन या राज्यातील शहाण्यांनी वेळीच सावध व्हावे. अन्यथा आपले बिहारच्या दिशेने सुरू असलेले कूच असेच सुरू राहील.

# व्यापाऱ्यावर प्राणघातक हल्ला; हल्लेखोरांना २४ तासात ताब्यात घेण्यात पोलिसांना यश

## अंबाजोगाईतील घटना,सर्व आरोपी अल्पवयीन

अंबाजोगाई, (प्रतिनिधी):- दिवसभराचे कामकाज आटोपून घराकडे निघालेल्या सुजित श्रीकृष्ण सोनी या तरुण व्यापाऱ्यावर कोयत्याने प्राणघातक हल्ला करून सोन्याची अंगठी आणि मोबाईल लंपास केल्याची घटना बुधवारी रात्री अंबाजोगाई शहरात घडली होती. या हल्लेखोरांना २४ तासात ताब्यात घेण्यात अंबाजोगाई शहर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश आले आहे. ही सर्व आरोपी अल्पवयीन आहेत. सुजित सोनी यांची नगर परिषद परिसरात कोलगेट सह अन्य कंपन्यांची एजन्सी आहे. बुधवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास कामकाज आटोपून घराकडे जात असताना यशवंतराव चव्हाण चौकातील नगर परिषद व्यापारी संकुलात असलेल्या हॉटेल कोकीताच्या मागील बाजूस तीन दुचाकीहून आलेल्या तीन हल्लेखोरांनी त्यांच्यावर कोयत्याने प्राणघातक हल्ला केला. त्यानंतर हल्लेखोरांनी सुजित यांची दोन तोळ्याची सोन्याची अंगठी आणि मोबाईल जबरदस्तीने काढून घेतला आन पळून गेले. त्यानंतर गंभीर जखमी झालेल्या सुजित यांनी स्वतःच्या दुचाकीवरून खाजगी रुग्णालय गाठले. या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली आणि वाप्पारी वर्गात भीतीचे वातावरणा पसरले. आधीच संवेदनशील झालेल्या बीड जिल्ह्यात पुन्हा हल्ल्याची घटना घडल्याने पोलिसांनी हे प्रकरण अतिशय गांभीर्याने घेतले. या प्रकरणी शहर पोलिसात कलम ३११, ३ (५) नुसार गुन्हा दाखल झाल्यानंतर अंबाजोगाई शहर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेने वेगाने तपासाला सुरुवात केली. अवघ्या २४ तासात पोलिसांनी या गुन्ह्याचा उलगडा करत चार अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेतले. यापैकी एक आरोपी सोनी यांच्याकडेच कामाला होता. त्यानेच सुजित यांच्याबाबत टीप साथीदारांना दिली अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली. ही कारवाई बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवीन नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक पांडकर, चेतना



तिडके पोलिस निरक्षक उस्मान शेख यांच्या विशेष मार्गदर्शना खाली पोलीस निरिक्षक विनोद घोळवे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुतळे, पोहेकॉ मारूती कांबळे, सचिन सानप, राजु पठाण, नितीन वडमारे, शहर पोलीस स्टेशनचे स पो उ नी कांबळे, स पो नी निंलगेकर, पो हे को आवले, कॉ नागरगोजे, चादर, काळे यांनी केली.

# कसाब प्रकरणातील न्यायाधीश आता संतोष देशमुख हत्येची चौकशी करणार

मुंबई, (वृत्तसेवा):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येची चौकशी करण्यासाठी आता न्यायालयीन समिती गठीत करण्यात आली आहे. सेवानिवृत्त न्यायाधीश एम.एल. ताहलियानी ही एक सदस्यीय समिती या प्रकरणाची चौकशी करणार आहे. एम एल ताहलियानी यांनी दहशतवादी कसाब खटल्यातील न्यायाधीश म्हणून काम केल्याची माहिती आहे. तर परभणी हिंसाचाराच्या वेळी कोठडीत मृत्यू झालेल्या सोमनाथ सूर्यवंशी प्रकरणाच्या चौकशीसाठीही निवृत्त न्यायाधीश व्ही एल आचलिया यांची एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. या दोन्ही समित्या सहा महिन्यात त्यांचा अहवाल देणार आहेत. राज्यभर गाजत असलेल्या सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एसआयटी स्थापन करण्यात आली आहे. तसेच सीआयडी देखील या प्रकरणाचा तपास करत आहे. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता त्याची न्यायालयीन चौकशी देखील करण्यात येणार आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणावर विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात निवेदन करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाच्या एसआयटी चौकशीसोबतच न्यायालयीन चौकशीची देखील घोषणा केली होती. मात्र या संदर्भात पुढील आदेश निघाले नसल्याने विरोधक सरकारला लक्ष करत होते. आता अखेर या प्रकरणाच्या चौकशीसाठी सेवानिवृत्त न्यायाधिश एम.एल. ताहलियानी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या चौकशी समितीचे मुख्यालय बीड येथे राहणार आहे. समितीला चौकशीसाठी कोणत्याही व्यक्तीला बोलावण्याचा तसेच कागदपत्रे जप्त करण्याचा, झडतीचा अधिकार राहणार आहे. सहा महिन्याच्या आत समितीने आपला अहवाल सरकारला सादर करायचा आहे. परभणीमध्ये १० डिसेंबर रोजी भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना झाली होती. त्यानंतर परभणीमध्ये मोठा हिंसाचार उसळला होता. त्याच केसमध्ये सोमनाथ सूर्यवंशी या ३५ वर्षीय वकील तरुणाला न्यायालयीन कोठडी देण्यात आली होती. पण कोठडीत असतानाच त्याचा मृत्यू झाल्याने या प्रकरणात सरकारवर मोठी टीका झाली. पोलिसांकडून करण्यात आलेल्या मारहाणीच्या धक्क्यामुळे सोमनाथचा मृत्यू झाल्याचं पोस्टमार्टेम अहवालात समोर आलं होतं. या प्रकरणाशी संबंधित पोलिसांना निलंबित करण्यात आलं आहे.

# नाशिकमध्ये कृष्णा आंधळे जिथे दिसला त्या आश्रमाचं वाल्मिक कराडशी कनेक्शन-तृप्ती देसाई

पुणे, (वृत्तसेवा):-बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात फरार असलेला संशयित आरोपी कृष्णा आंधळे हा नाशिक परिसरात फिरत असल्याचे काही फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. या व्हायरल फोटोचा पोलिसांनी शोध घेत नाशिकच्या मुक्तिधाम परिसरात सर्च ऑपरेशनही केलं. पण, वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे हे १५ आणि १६ डिसेंबर २०२४ ला दिंडोरी इथं आश्रमात मुक्कामी होते, असा आरोप भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई यांनी केला आहे. भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाई यांनी न्यूज१८ लोकमतशी बोलताना सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून राज्य सरकारवर गंभीर आरोप केले आहे. तसंच, वाल्मिक कराड आणि विष्णू चाटे हे १५ आणि १६ डिसेंबर २०२४ ला दिंडोरी इथं आश्रमात मुक्कामी होते. त्यांना तिथे कोणी आश्रय दिला? पथक तिथे जाऊन आले. मग त्यांनी त्या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज का बघितले नाही. या आश्रमाचे महाराज आणि गृहमंत्री यांचे संबंध आहेत. म्हणून कारवाई झाली नाही का? असा सवालच तृप्ती देसाई यांनी केला. ''श्रीराम खंडेराव मोरे हे आश्रमाचे प्रमुख आहेत. त्यांना गुरू माऊली म्हणून ओळखलं जातं. मठाचे मठाधिपतींनी अनेक महिलांचं लैंगिक शोषण केलं आहे. अनेक महिलांच्या तक्रारी आहेत. या मठाविरोधात २०२३ मध्ये काही तक्रारी होत्या. त्या मिटवण्यासाठी वाल्मिक कराडने मध्यस्थी केली होती, असा दावाही देसाई यांनी केला. 'अण्णासाहेब मोरे यांना सह आरोपी करण्यात यावं. अण्णासाहेब मोरे महाराष्ट्रातील आसाराम बापू आहेत. त्याचे ऑडियो, व्हिडिओ मी उघड करणार' असा निर्धारही त्यांनी बोलून दाखवला.

# वाल्मिक कराडकडून जप्त केलेलं सीम अमेरिकेत रजिस्टर? आकाचं कनेक्शन आता थेट महासत्ता अमेरिकेपर्यंत?

बीड, (प्रतिनिधी):-बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात दररोज नवनवीन माहिती समोर येत आहे. या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याला ७ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावण्यात आली आहे. सीआयडी आणि एसआयटीचा या प्रकरणात सखोल तपास सुरु आहे. तसेच राज्य सरकारने या प्रकरणाच्या तपासासाठी न्यायालयीन समितीदेखील गठीत केली आहे. या सर्व घडामोडींदरम्यान आता सूत्रांकडून मोठी माहिती समोर येत आहे. आकाचं कनेक्शन आता थेट महासत्ता अमेरिकेपर्यंत? असा प्रश्न आता उपस्थित होतोय. कारण वाल्मिक कराड याच्याकडून जप्त करण्यात आलेलं सीम कार्ड हे अमेरिकेत रजिस्टर असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. वाल्मिक कराडकडच्या मोबाईल जप्तीनंतर ही धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे निवडणूक काळात याच सीममधून अनेक फोन झाल्याचा एसआयटीला संशय आहे. दरम्यान, भाजप आमदार सुरेश धस यांना याबाबत पत्रकारांनी प्रश्न विचारला. त्यावर त्यांनी महत्त्वाची प्रतिक्रिया दिली. ''आका जो आहे तो सोपा आका नाही. या आकाकडे १७ मोबाईल होते. तुम्ही आता नाविन्यपूर्ण योजना सांगितली की, तो अमेरिकेहून धमकी देत होता. तो अमेरिकेचे



सीम वापरत असेल. तो ते वापरत असेल. आका काय-काय नाही करु शकत? आकाचा बाका ५०-५० लोकांना प्रत्येक महिन्याला काहीतरी ठराविक लोकांना रक्कम पाठवत होता'', असा धक्कादायक दावा सुरेश धस यांनी केला. राजकीय वरदहस्त नसतं तर वाल्मिक कराड इतका मोठा कधी झालाच नसता. धनंजय मुंडेंनी कराडला पदोपदी वाचवलं नसतं तर तो इतका मोठा झालाच नसता. माझं सरळसरळ म्हणणं आहे की, ते दोन वेगळे नाहीत. एकच गुन्हा आहे. खंडणी पासून गुन्ह्याला सुरुवात झाली आणि याच गुन्ह्यातून संतोष देशमुख यांची हत्या झाली. त्यांनी विरोध केला नसता तर त्यांची हत्याच झाली नसती. कारण खंडणी मागणं आणि दहशत निर्माण करणं एकच होतं. त्यातूनच ही हत्या झाली.

पान १ वरून

### धनंजय मुंडेंचा...

जातात. आजही घराबाहेर पडतात त्यांनी सर्वप्रथम बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग असलेल्या प्रभू वैद्यनाथांचे मनोभावे दर्शन करून विधिवत पूजन केले व त्यानंतर ते जनता संवाद उपक्रमासाठी त्यांच्या जगमित्र या कार्यालयात दाखल झाले.

### पंचायत समिती वैयक्तिक...

मागणी सरपंच, उपसरपंच संघटनेच्या वतीने गटविकास अधिकारी यांना निवेदन देऊन करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष धनंजय गुंदेकर, जिल्हा उपाध्यक्ष वैभव मोरे, शिवणी सरपंच विजय सुपेकर, मौजवाडी सरपंच तेजाब चव्हाण, सरपंच जगताप, संदीपान बडगे, महादेव शेळके यांसह मोठ्या संख्येने सरपंच, उपसरपंच, लाभार्थी उपस्थित होते.

### वाल्मिक कराडच्या...

आम्ही त्यावर बोलू शकत नाही. मी भाजपचा माणूस आहे, मी राष्ट्रवादीचं कशाला सांगू? पण राष्ट्रवादीवाल्यांनी जो काय विचार करायचा, तो करावा. राष्ट्रवादीतल्या अंतर्गत प्रश्नावर मज पामराने काय बोलावे? असा टोला सुरेश धस यांनी लगावला. ✻ आका, चाचा, मामा सगळे फासावर: पोलिसांकडून कोणत्याही त्रुटी राहिल्या तरी न्यायालयीन चौकशीमध्ये कसलीही त्रूट राहू शकत नाही. जो कोणी आका, चाचा, मामा यात आहेत, ज्यांनी संतोषला क्रुरपणे मारलं ते सगळे फासावर जाण्यासाठी न्यायालयीन चौकशीचा फायदा होईल. न्यायालयाने चौकशी लवकरात लवकर पूर्ण करावी, अशी मागणी सुरेश धस यांनी केली आहे.

### पतंग उडवताना...

जिल्ह्यात अनेक ठिकाणी पतंग उडवताना काळजी घेतली जात नाही. त्यातून गंभीर अपघात होवू शकतात. असे अपघात टाळण्यासाठी नायलॉन मांजाचा वापर टाळा. याचबरोबर नायलॉन मांजा कुणी वापरत असेल तर प्रशासनाला कळवा असे आवाहनही डॉ.अशोक थोरात यांनी केले आहे. नायलॉन मांजा विक्री आणि वापरावर बंदी आहे. कुणी विक्री करतं असेल तर गुन्हा दाखल होवू शकतो.

पान १ वरून

### मोदी सरकारचं मोठं...

आणि पेन्शनधारक बऱ्याच काळापासून या सवलतीची वाट पाहत होते. आतापर्यंत जेव्हा संसदेत यासंबंधी प्रश्न विचारले जात होते, तेव्हा सरकार असा कोणताही प्रस्ताव येत नसल्याबद्दल बोलत होते. अचानक सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांना आठवा वेतन आयोग लागू करणार असल्याता निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतला आहे. आतापर्यंत सात वेतन आयोग स्थापन झाले आहेत. देशातील पहिला वेतन आयोग जानेवारी १९४६ मध्ये स्थापन झाला. त्याचप्रमाणे, मागील म्हणजेच सातवा वेतन आयोग २८ फेब्रुवारी २०२४ रोजी स्थापन करण्यात आला होता.

### लाडक्या बहिणीचा...

'' आदिती तटकरे म्हणाल्या की, ''आम्ही फेब्रुवारीचे नियोजन सुद्धा करत आहोत. लाडकी बहीण योजनेचा लाभ आम्ही २ कोटी ४६ लाख महिलांना दिला. काही महिलांबाबत तक्रार आली होती. ड्युप्लिक्शन झालेल्या केसेस कमी होत्या. त्यामुळे फार काही फरक पडेल असे मला वाटत नाही. थोड्याफार कमी होतील.'' ✻ मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ कुणाला? : ✻ वय २१ ते ६० वर्षे ✻ दरमहा १५०० रुपये मिळणार ✻ दरवर्षी शासन ४६००० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देणार ✻ अंमलबजावणी : जुलै २०२४ पासून ✻ कोण असणार पात्र? : ✻ महाराष्ट्र रहिवासी ✻ विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला ✻ लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु.२.५० लाखापेक्षा जास्त नसावे ✻ ६० वर्षे पेक्षा जास्त वय असेल तर अपात्र असाल ✻ अपात्र कोण असेल? : ✻ २.५० लाख पेक्षा जास्त उत्पन्न असणारे ✻ घरात कोणी भरत असेल तर ✻ कुटुंबातील कोणी सरकारी नोकरी किंवा निवृत्तीवेतन घेत असेल तर ✻ कुटुंबात ५ एकर पेक्षा जास्त जमीन असेल तर ✻ कुटुंबातील सदस्यांकडे ४ चाकी वाहन असेल तर ( ट्रॅक्टर सोडून )

पान १ वरून

### बीडसह मराठवाड्यात...

पण मराठवाड्यात गावठी कट्टे नेमके येतात कुठून असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. पिस्तुलातून हवेत बार उडवणे हे मराठवाड्यात आता नेहमीचेच झालं आहे. परळीच्या निमित्ताने हा मुद्दा समोर आला. मराठवाड्यात किती गावठी कट्टे येतात आणि कुठल्या जिल्ह्यात किती वापरले जातात याची माहिती घेतली आणि पुढे आलं धक्कादायक वास्तव. बंदुकीचा परवाना काढण्यासाठी अनेक परवानग्या काढव्या लागतात. त्यामुळे शस्त्र परवाना काढणं हवं तेवढं सोपं नाही. पण गावठी कट्टा सहज मिळून जातो, तेही वीस ते पंचवीस हजार रुपयात. यासाठी ना कोणती एनओसी लागते ना, कोणत्या कार्यालयात खेट्या घालाव्या लागतात. त्यामुळे मराठवाड्यात गेल्या काही वर्षात गावठी कट्ट्यांचे प्रमाण वाढलं आहे. याच गावठी कट्ट्यांमुळे टोळक्यांचं प्रमाण वाढलं. बरं आता या टोळक्या एवढ्या मस्तावल्या आहे की, त्यांना वाटेल त्याचा ते जीव घेत आहेत. मराठवाड्यात गावठी कट्टे विक्री करणारे एक रॅकेट आहे. खंडणी आपण आणि इतर गुन्ह्यासाठी धमकावण्यास या गावठी कट्ट्याचा वापर केला जातो. ✻ बीडमध्ये हे कट्टे येतात तसे यावर एक नजर टाकूया : मराठवाड्यातील गावठी कट्टे बहुतेकदा अवैध मार्गाने बनवले जातात किंवा बाहेरील राज्यांमधून आणले जातात. या कट्ट्यांची निर्मिती आणि वितरण हे पूर्णपणे अनधिकृत व बेकायदेशीर असते. ✻ कट्टे कसे तयार होतात आणि कुठून येतात? : उत्तर भारतातील राज्ये: उत्तर प्रदेश, बिहार, आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये अशा गावठी शस्त्रांची मोठ्या प्रमाणावर निर्मिती होते. मराठवाड्यात या शस्त्रांची तस्करी करून आणली जाते. स्थानिक निर्मिती: काही वेळा मराठवाड्यातील दुर्गम भागात, लहान गावांत किंवा जंगल परिसरातही कट्टे तयार होतात. यासाठी अर्धशिक्षित कारागीर किंवा लोहार त्याचा वापर करतात. तस्करीचे मार्ग: हे शस्त्र स्थानिक गुन्हेगारी टोळ्यांकडून रेल्वे, रस्ते वाहतूक किंवा खाजगी वाहने वापरून मराठवाड्यात पोहोचते. गुन्हेगारी मागणी: राजकीय दबाव, स्थानिक वाद, किंवा इतर गुन्हेगारी कृत्यांमध्ये गावठी कट्ट्यांची मागणी वाढते, ज्यामुळे त्याचा प्रसार होतो.

## टीम इंडियाचा विजयी चौकार

# पाकिस्तानला ५ विकेट्सने लोळवलं,अंतिम फेरीत धडक

नवी दिल्ली, (वृत्तसेवा):-भारतीय दिव्यांग क्रिकेट संघाने टी २० चॅम्पियन्स ट्रॉफीत विजयी चौकार लगावला आहे. टीम इंडियाने विक्रांत केणी याच्या नेतृत्वात कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ५ विकेट्सने धुव्वा उडवला आहे. टीम इंडियाने या विजयासह चॅम्पियन्स ट्रॉफी फायनलमध्ये धडक दिली आहे. पाकिस्तानने टीम इंडियाला विजयासाठी १३९ धावांचं आव्हान दिलं होतं. टीम इंडियाने हे आव्हान ५ विकेट्सच्या मोबदल्यात १२ चेंडूआधी पूर्ण केलं. टीम इंडियाने १८ षटकांमध्ये १४१ धावा केल्या. टीम इंडियाचा हा या स्पर्धेतील पाकिस्तानविरुद्धचा दुसरा विजय ठरला. टीम इंडियाने याआधी पाकिस्तानला १२ जानेवारीला लोळवलं होतं. ✻ टीम इंडियाची बॅटिंग: राजेश कन्नूर हा टीम इंडियाच्या विजयाचा शिल्पकार ठरला. राजेशने सलग दुसरं अर्धशतक झळकावलं. राजेशने बुधवारी १५ जानेवारीला श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात ६० धावा केल्या होत्या. त्यानंतर आता राजेशने ५२ बॉलमध्ये नॉट आऊट ७४ रन्स करत टीम इंडियाला विजयी केलं. तर पाकिस्तानकडून वाकिफ शाह याने २३ धावा देत २ विकेट्स घेतल्या. ✻ पहिल्या डावात काय झालं? : त्याआधी पाकिस्तानने टॉस जिंकून बॅटिंगचा निर्णय केला. पाकिस्तानने २० ओव्हरमध्ये ५ विकेट्स गमावून १३८ धावा केल्या. पाकिस्तानसाठी सैफ उल्लाह याने अर्धशतक ठोकलं. सैफने ५१ बॉलमध्ये ५८ रन्स केल्या. एम नोमान याने ४२ चेंडूत ४५ धावा जोडल्या. तर टीम इंडियासाठी जितेंद्र हीने ४ ओव्हरमध्ये २५ रन्स देत सर्वाधिक ४ विकेट्स घेतल्या.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# रस्ता रूंदीकरणात पाडली छत्रपती शिवाजी महाराज चौक ते दवाखाना या राज्य मार्गावरील अतिक्रमणे..?

## विकासाच्या नांवाखाली गोरगरिबांचे संसार उद्धवस्त केले : ऍड.इस्माईल गवळी व कॉ.बब्रुवाहन पोटभरे यांची पत्रकार परिषद

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

रस्त्याच्या रूंदीकरणासाठी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्वाराती दवाखाना या रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्याची मोहीम नुकतीच राबविण्यात आली. या म ोहिमेअंतर्गत मागील अनेक वर्षांपासून या रस्त्याच्या दोन्ही बाजूला राहत असलेल्या २०० हून अधिक नागरिकांची घरे, दुकाने जमीनदोस्त करण्यात आली. त्यामुळे या भागातील नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात नाराजी आणि तीव्र संताप व्यक्त होत आहे. याप्रश्नी गोरगरीब नागरिकांचा आवाज सरकारपर्यंत पोहचविण्यासाठी अंबाजोगाईतील सदर बाजार चौक येथे गुरूवारी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी जमीन अधिगृहणाबाबत लेखी सूचना नाही, मालम त्तांबाबत काय निर्णय घेतला असा सवाल करून विकासाच्या नांवाखाली गोरगरिबांचे संसार



उद्धवस्त केले हे योग्य नाही. याचा आम्ही निषेध व्यक्त करतो. याप्रकरणी आम्ही न्यायालयात जाऊन दाद मागणार आहोत, लोकशाही मार्गाने आंदोलन करणार आहोत असे ऍड. इस्माईल गवळी व कॉ.बब्रुवाहन पोटभरे पत्रकार परिषदेत म्हणाले.

अंबाजोगाई शहरात रस्त्याच्या रूंदीकरणाच्या नांवाखाली गुत्तेदार लोकांची घरे भरण्याचे काम चालू आहे. विकासकामांना आमचा विरोध नाही. पण, रस्ता किती फुटांचा होणार ? अतिक्रमणाच्या नांवाखाली गोरगरीब लोकांचे संसार उद्धवस्त केले. त्यामुळे आता या अतिक्रमण धारकांचे पुनर्वसन होणार की, नाही ? छत्रपती शिवाजी महाराज चौक ते स्वाराती दवाखाना हा रस्ता राज्य मार्ग कधी झाला व त्याची प्रक्रिया काय आहे ?, दोन वर्षांपूर्वी या रस्त्यावर दोन्ही बाजूंचे नाली बांधकाम ८० फुटांचे का केले. मग रस्त्याच्या मध्यभागी (सेंटर) पासून किती अंतर मोजले..?, नागरिकांच्या अतिक्रमणांचे पंचनामे केले नाही, तसेच ज्यांची घरे मालकीची आहेत त्यांना जमीन अधिगृहणाबाबत लेखी सूचना का दिल्या नाहीत, मालमत्तांबाबत काय निर्णय घेतला..?, अंबाजोगाई शहरातून १०० फुटांचा रस्ता करण्याची काय आवश्यकता, गरज होती..?, हि तत्परता येल्डा रोडबाबत का दाखवली नाही..? मागील पाच वर्षांपासून हा रस्ता रखडला आहे, या नादुरूस्त रस्त्यामुळे १७ लोकांचा जीव गेला आहे. अंबाजोगाई तहसील कार्यालयाच्या सम ोरील दुकाने हटवली. त्यांना त्या जागेवर दुकान का दिले नाही. मंडी बाजार भागातील रस्त्यांच्या कडेला कसे दिले.

## व्यापाऱ्यावर प्राणघातक हल्ला; हल्लेखोरांना २४ तासात ताब्यात घेण्यात पोलिसांना यश

### अंबाजोगाईतील घटना, सर्व आरोपी अल्पवयीन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दिवसभराचे कामकाज आटोपून घराकडे निघालेल्या सुजित श्रीकृष्ण सोनी या तरुण व्यापाऱ्यावर कोयत्याने प्राणघातक हल्ला करून सोन्याची अंगठी आणि म ोबाईल लंपास केल्याची घटना बुधवारी रात्री अंबाजोगाई शहरात घडली होती. या हल्लेखोरांना २४ तासात ताब्यात घेण्यात अंबाजोगाई शहर पोलीस आणि स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना यश आले आहे. ही सर्व आरोपी अल्पवयीन आहेत.



*जालना रेल्वे संघर्ष समितीचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन.*

## मैत्रा फाऊंडेशनचा शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार गंगाधर डवरे यांना जाहीर

**वडवणी । प्रतिनिधी**

येथील सामाजिक क्षेत्रात कार्यरत मैत्रा फाऊंडेशन दरवर्षी विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान करते. यावर्षीचे पुरस्कार नुकतेच जाहीर झाले असून वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचाळा येथील प्राथमिक शिक्षक गंगाधर हरी डवरे यांना जाहीर झाला आहे त्यामुळे डवरे यांचा सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. डवरे यांनी



वडवणी तालुक्यातील सतेवाडीच्या अतिशय ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १२ वर्षे तर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचाळा येथे मागील ५ वर्षापासून वेगवेगळे उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना आनंददायी व गुणवत्तापूर्ण शिक्षण देत आहेत. डवरे यांनी कोरोना काळात स्वतःचे ज्ञानगंगा यूट्यूब काढून विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण देऊन त्यांचे शैक्षणिक नुकसान टाळले. याशिवाय राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे मार्फत दर्जेदार व्हिडिओ निर्मिती स्पर्धेमध्ये तालुकास्तरीय प्रथम क्रम ांक मिळविला तर जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला.

## वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवडा विविध उपक्रमांतून साजरा



**नेकनूर । प्रतिनिधी**

माऊली विद्यापीठ केज संचलित प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय नेकनूर येथे राष्ट्रीय सेवा योजना व ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवडा विविध उपक्रमांतून साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन मुंबई, व डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या पत्रानुसार दि.१ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत वाचन पंधरवाडा राबविण्यात यावा असे कळविण्यात आले. यानिमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ढास डी. के. यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त ऑनलाइन बुक्स ची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. नवीन शैक्षणिक धोरण सुधारित पुस्तकांचे ग्रंथ प्रदर्शन विद्यार्थी आणि विद्यार्थिनी साठी आयोजन करण्यात आले. ग्रंथालय विभाग अंतर्गत महत्त्वपूर्ण अग्रलेख कात्रण फाईलचे प्रकाशन करण्यात आले. तसेच सलग १२ तास वाचन व वाचनावर चर्चा इत्यादी स्वरूपाचे उपक्रम राबविण्यात आले. या पंधरवडा उपक्रमासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## हजरत ख्वाजा शेख मसूद किरमाणी दर्ग्याचा ८०३ व्या उर्सचे अयोजन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरालगत आसलेली हजरत ख्वाजा शेख मसूद किरम ाणी दर्गा सर्वधर्मीयांचे श्रद्धास्थान आहे. हजरत सय्याद अख्तर अलीशाह हसनी हुसेनी दरबार मुरशदी दुरवेशीशाही गदी नशीन रहे. व जेरे ईन्यात हजरत सय्यद सुजाऊद्वीन अलीशाह कादरी रहे.(जहीरोद्धीन ) अलीशाह खादीरी अली यांच्या अशीर्वादाने हजरत ख्वाजा शेख मसूद किरमाणी दर्ग्याचा ८०३ व्या उर्सचे अयोजन.१५,१६,१७, १८१९ रोजी करण्यात आले आहे.१७ जानेवारी रोजी खतीब गल्ली करमानी चौकातून तर १८



जानेवारिरोजी सदर बाजार येथुन वाजत गाजत संदल निघणार आहे.तर ऊर्स काळात लतीफ हैरा जळगाव, गुलनार बानो अहमदनगर, परवीन अजमेरी अहमदनगर, चनचलनाज म ुंबई,रफीक शोला मुंबई,कनक जोशी बेंगलोर यांचा कमुकाबला १७ ते १९ जानेवारी असा तिन दिवस कव्वाली मुकाबला रंगनार आहे.ऊर्स काळात महाप्रसादाचे अयोजन ऊर्स कमेटीच्या वतीने करण्यात आले आहे. पंचक्रोशीतील भावीक भक्तानी दर्शन, कव्वाली मुकाबला व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे अव्हाण हजरत ख्वाजा शेख मसूद किरमाणी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष मोहम्मद आसेफोद्धीन खतीब, सचिव शेख ऐजाज व ऊर्स कमेटीच्या वतीने करण्यात आले आहे.

## बालपणीच वाचनाची गोडी लागावी म्हणून पालकांनी विद्यार्थ्यांच्या हाती चांगली पुस्तके देणे हिताचे : माया दिवाण

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षणाने माणसाचे मस्तक सशक्त होते व सशक्तमस्तक कोणा पुढेही नतमस्तक होत नाही. त्याकरिता पालकांनी आपल्या पाल्यास बालपणीच वाचनाची चांगली पुस्तके दिली पाहिजेत. विद्यार्थ्यांनी देखील आपले ध्येय निश्चित करून अभ्यासातील सातत्य, गुरुजनांच्या म ार्गदर्शनाचा लाभ घेऊन आपल्या आई-वडिलांच्या कष्टाची जाण ठेवून आपल्या ध्येयपूर्ती कडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रमाणे १८, १८ तास वाचन करून वाटचाल करावी असे प्रतिपादन माया दिवाण यांनी केले. वाचन संकल्प महाराष्ट्राचा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार



दिनाचे औचित्य साधून महामानव अभिवादन ग्रुप व वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाने बलभीम नगर पालवन रोड बुद्ध विहार येथे आयोजित केलेल्या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख वक्त्या म्हणून माया दिवाण उपस्थित होत्या तर कार्यक्रमाचे अध्यक्षपदी सेवानिवृत्त केंद्रप्रमुख ए.एल. अवसरमोल लाभले होते. महाम ानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले, प्रा.डॉ. शिवाजीराव दिवाण , कॅप्टन राजाभाऊ आठवले, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत वासनिक, प्रा.अशोक गायकवाड, यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रस्ताविक अँड.तेजस वडमारे यांनी तर सूत्रसंचालन डी.एम.राऊत यांनी केले.

## पैसे नसल्याने गावाकडे परत आणलेल्या आरती कटारे यांना जीवनदान: डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या मदतीने झाले उपचार

**माजलगाव । प्रतिनिधी**

नुकतीच प्रसूती झालेल्या वीस वर्षीय तरुणीच्या मेंदूत रक्तस्राव झाल्याचे निदान डॉक्टरांनी केले. तसेच रुग्णाला ताबडतोब संभाजीनगर ला हलविण्याच्या सूचना दिल्या. पतीने पत्नीला वाचविण्यासाठी तातडीने संभाजीनगर गाठले. मात्र डॉक्टरांची गडगंज फिस भरण्याची ऐपत नसल्यामुळे महिलेला घरी परत आणले. परंतु आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी उपचारासाठी लागणाऱ्या खर्चाची तरतूद करुन दिल्याने सदरील म हिलेला जीवनदान मिळाले आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की, माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील कैलास कटारे हा तरुण भूमिहीन आहे. तो पाण्याच्या जार प्लांट वर रोजंदारीने काम करुन चरितार्थ चालवतो. वडिलांचे छत्र हरवलेल्या कैलासचा विवाह दोन



वर्षांपूर्वी झाला होता. दोघांचा संसार गुण्या गोविंदाने चालू होता. कुटुंबातील सर्वजण नवीन पाहुण्याचे आगमन होणाऱ्या आनंदात होते. कैलासची पत्नी आरती हिला प्रसूतीसाठी परळी येथील सरकारी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. नैसर्गिक प्रसूती झाल्यानंतर सर्वांना आनंद झाला.

**● ब्रेन हॅमरेज झाल्यामुळे आरतीच्या मेंदूत रक्तस्राव झाला होता. अशा रुग्णांना ताबडतोब उपचार मिळणे अत्यंत गरजेचे असते. परंतु उपचारादरम्यान काही दिवसांचा कालावधी गेल्यामुळे रुग्णाच्या जिवितास धोका निर्माण झाला होता. मात्र डॉ. ओमप्रकाश शेटे सरांचा पाठपुरावा, आमच्या डॉक्टरांचे प्रयत्न व ईश्वराच्या कृपेने आरती कटारे आता बरी झाली आहे.** – डॉ. उन्मेष टाकळकर (सिग्मा हॉस्पिटल, संभाजीनगर)

## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २८६/२०२४**
**अ‍ॅड.एस.एस.महाजन यांच्या मार्फत**
**उर्मिला भ्र. शरद माने विरुध्द ग्रा.पं.कुकुडगाव**

पहा, १. उर्मिला भ्र. शरद माने, रा. कुकुडगाव ता.जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत रामजी किसन तोडेकर यांचा दिनांक १९/०६/१९९९ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प.कार्यालयास कुकुडगाव ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन,त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे कुडगाव ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०६/०१/२०२५,रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

**सदर प्रकरणात पुढील तारीख ०१/०२/२०२५ ही आहे.**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**तहसिलदार,**
**बीड करीता**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

### मा. श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, बीड यांच्या न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : ५७ / २०२५**
**( मार्फत विधिज्ञः – श्री एस एस महाजन)**

अर्जदार :-१. भिमसिंग पि. महासिंग टाक, वय ६४ वर्षे, धंदा मजुरी, रा. त्रिभुवन फलोअर मिल, छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर, २. जयसिंग पि. महासिंग टाक, वय ५५ वर्षे, धंदा मजुरी, रा. बलभीम नगर, बीड, ता.जि. बीड. ३. रामसिंग पि. महासिंग टाक, वय ५४ वर्षे, धंदा व्यापार, रा. वरीलप्रमाणे, ४. राजु पि. महासिंग टाक, वय ४४ वर्षे, धंदा व्यापार, रा. वरीलप्रमाणे,

विरुध्द निरंक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी नामे **अंगुरीबाई महासिंग टाक या दि. १९/०१/२०१३ रोजी आनंदवाडी, ता. जि. बीड** येथे मयत झालेले असुन अर्जदार क १ ते ४ हे मयताचे मुले आहेत.

अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक: १०/०१/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली. पुढील तारीख :- २०/०२/२०२५.

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

## जाहीर प्रगटन

### मा. श्री.अक्षयं सं. जगताप दिवाणी न्यायाधीश क. स्तर शिरूर कासार यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज नं.२५९/२०२४**
**अँड. कोठुळे एच.एस.यांच्या मार्फत**
**सिंधुबाई जयसिंग धांडे विरुध्द निरंक**

अर्जदार : १. सिंधुबाई भ्र. जयसिंग धांडे, वय ४४ वर्षे, धंदा – शेती, घरकाम, रा.जांबता ता. शिरुर कासार, जि. बीड. मो.

विरुध्द ...

गैरअर्जदार : निरंक

**अर्जः बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाण मिळणे बाबत.**

ज्यापोक्षा **अमोल पि ज्यसिंग धांडे हे जिल्हा रुग्णालय, बीड ता. जि. बीड येथे दिनांक ०२/०९/२०२४ रोजी मयत झालेले आहेत.** अर्जदार ही मयताची आई आहे. तसेच मयताचे वडील व अर्जदार हीने पती हे हयात आहेत परंतु ते प्रथमश्रेनीतील कायदेशीर वारस होत नसल्याने त्यांचे नाव अर्जदार म्हणून सामाविष्ट केलेले नाही. अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस आहेत हे की, त्यापेक्षा सदरहु अर्जदार है उपरोक्त मयत यांचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, उपरोक्त मयत यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/१०/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख ०५/१२/२०२४ ही आहे.

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिरूर का.**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

### श्री. आर. आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई

**गेवराई, जि. बीड यांचे न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज क. ३१/२०२५ प्रयागबाई व ईतर २ वि. निरंक**
**(मार्फत – ॲड. ए. एम. घोडके, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे लक्ष्मण पि. अच्युतराव खेत्रे, मौजे रा. सुलतानपुर, ता. गेवराई, जि. बीड हे दिनांक २३/१०/२०२४ मौजे सुलतानपुर, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले.

अर्जदार :- १) प्रयागाबाई भ्र.लक्ष्मण खेत्रे, वय ७१ धंदा घरकाम, रा. सुलतानपुर, ता. गेवराई, जि. बीड. २) सरस्वती भ्र. भागवत आखाडे, वय ४०, धंदा शेती, रा. सदर. ३) मंदाकीनी भ्र. परमेश्वर कडुकर, वय ३५, धंदा शेती, रा. तिर्थापुरी, ता. घनसावंगी, जि. जालना.

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे लक्ष्मण पि. अच्युतराव खेत्रे, मौजे रा. सुलतानपुर, ता. गेवराई, जि. बीड यांचे वारसाचे प्रम ाणपत्र देण्यात येईल. आज दिनाक –/ ०१ / २०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २५/०२/२०२५

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई**
**ता. गेवराई, जि. बीड**

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

# मनोज जरांगे, आ.सुरेश धस, खा. बजरंग सोनवणे, आ. प्रकाश सोळंके, आ.संदिप क्षीरसागर यांची बदनामी केल्याने त्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेकाने चोख प्रत्युत्तर

**आष्टी । प्रतिनिधी**

स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी आरोपीवर कठोर कारवाईची मागणी करणारे संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील,अन्याया विरुद्ध वेळोवेळी आवाज उठवणारे आ.सुरेश धस,खा.बजरंग सोनवणे,आ. प्रकाश सोळंके,आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रतिमेवर जोडे मारो आंदोलन करून या नेत्यांची बदनामी केली असल्याने पुणे, बीड जिल्ह्यासह विविध ठिकाणी या नेत्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून प्रत्युत्तर देण्यात आले आहे याबाबत अधिक माहिती अशी की,

काल परळी शहरात चौकशीअंती वाल्मिक कराड याला मकोका या कायद्यान्वये




विशेष चौकशी समितीने ताब्यात घेतल्यामुळे वाल्मीक कराड समर्थकांकडून बीड जिल्ह्यात संचारबंदी कायदा १४४ लागू असतानाही आरोपींच्या बाजूने चुकीच्या पध्दतीने समर्थन करून आरोपीना शिक्षा व्हावी ही सतत मागणी करणाऱ्या नेत्यांच्या प्रतिमेला काळे फासून निषेध व्यक्त करत जोडे मारो आंदोलन केले आणि या निंद्य प्रकाराचे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करून या सर्व नेत्यांची बदनामी केल्यामुळे स्व.संतोष देशमुख हत्या प्रकरणी अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सर्व सर्वसामान्य लोकांच्या भावना दुखावल्या आहेत.

काल परळी मध्ये जो निंदनीय प्रकार आरोपीच्या समर्थनार्थ घडला असून सर्व दोषींवर योग्य ती काय कायदेशीर कठोर कारवाई करावी यापुढेही असा प्रकार होणार नाही.या मागणीसाठी आष्टी मतदार संघातील सर्व जाती-धर्माच्या लोकांनी एकत्र येत निषेध व्यक्त करत छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच जिल्ह्यात विविध ठिकाणी संघर्षयोद्धा मनोज जरांगे, आ.सुरेश धस, खा. बजरंग सोनवणे,आ.प्रकाश सोळंके,आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या अशा घोषणाबाजी करत अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या नेत्यांना समर्थन दिल्याचे पाहायला मिळाले. यावेळी आष्टी पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक श्री शरद भुतेकर यांना आणि आष्टी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री बाळकृष्ण पाटील हणपुडे यांच्याकडे मनोज रंगे पाटील आमदार सुरेश धस खासदार बजरंग सोनवणे आमदार प्रकाश सोळंके आणि आमदार संदीप क्षीरसागर यांची बदनामी करणाऱ्या या व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी या मागणीचे स्वाक्षऱ्या केलेले निवेदन दिले.

## उमेद' तर्फे वस्तू व खाद्यान्न विक्री प्रदर्शनाचे उद्घाटन
# बचत गटामुळे आर्थिकदृष्ट्या जीवनमान उंचावले: जिल्हाधिकारी अविनाश पाठक



**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात बचतगट विकसित झाले आहेत. बचतगटामुळे आर्थिक दृष्ट्या मोठी मदत झाली आहे. बचत गटांनी वस्तू निर्मितीमध्ये आंबेसेटर ब्रँड निर्माण केला. पाककला मोठा अभ्यासक्रम आहे, असे प्रतिपादन बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले.

बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण, जिल्हा परिषद बीड समोरील मैदानावर उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानचे 'जिल्हास्तरीय मिनी सरस'चे भव्य विक्री व प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने यांचे हस्ते गुरुवारी करण्यात आले. यावप्रसंगी बोलताना जिल्हाधिकारी पाठक म्हणाले, महिलांमध्ये उद्योजक बनवण्याचे मोठे साधन आहे. इच्छाशक्ती नसेल तर क्षमता असतानाही पैसे परतफेड लोक करत नाहीत. परंतु अलीकडे आर्थिक शिस्त अधिक चांगली करा. उपक्रम चांगला चालू आहे.

# शेतकऱ्यांकडून बाँड पेपरवरची मागणी बंद करा अन्यथा अंदोलन करु : वंचितची मागणी


**गेवराई । प्रतिनिधीं**

तालुक्यातील २०२४ या खरीप हंगामातील पिके अतिवृष्टीमुळे वाया गेले होते. त्या पिकांची नुकसान भरपाई म्हणून शासन अत्यंत उशिराने तुटपुंजी मदत देत आहेत. त्यातच अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी या समाईक क्षेत्र असल्याने खात्यावर रक्कम जमा करण्यासाठी ७/१२ वर समाईक जमिन असल्याने तलाठी शेतकऱ्यांकडून बाँडवर नोटरीसह संमतीपत्राची मागणी करत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना नाहक अर्थीक भुर्दंड सोसावा लागत असल्याने सदरील बाँडपेपरवरील संमतीपत्राची अट रद्द करण्यात यावी अन्यथा शेतकऱ्यांसह तहसिल कार्यालयावर तिव्र स्वरूपाचे अंदोलन करु असा ईशारा वंचीत बहुजन आघाडी गेवराई तालुक्याच्या वतीने राजेंद्र पोकळे, पप्पु गायकवाड, किशोर भोले, ज्ञानेश्वर हवाले यांच्या स्वाक्षरीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# अंबाजोगाईत आयएमएच्या वतीने एक दिवसीय आयएम एकॉन वैद्यकीय परिषद थाटात संपन्न : डॉ.नवनाथ घुगे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरात आयएमए अंबाजोगाईच्या वतीने रविवार दि.१२ जानेवारी रोजी स .९ ते सायं.५ या वेळेत एक दिवसीय आयएमएकॉएम वैद्यकीय परिषद मोठ्या उत्साहात व थाटात संपन्न झाली. या आयएमएकॉन मध्ये विद्यमान काळातील वैद्यकीय क्षेत्रातील बदल व तंत्रज्ञानाच्या सहकार्याने होत असलेली प्रगती यावर विचार मंथन पार पडले असल्याची माहिती आयएमए अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे यांनी सांगितले.



अंबाजोगाई शहरातील हॉटेल पियुष इन या ठिकाणी आयएमएकॉन परिषदेचे आयोजन रविवार दि. १२ जानेवारी रोजी करण्यात आल. या आयएमएकॉन परिषदेला वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ डॉक्टर,अधिव्याख्याते व इतर नामांकित डॉक्टरांनी मार्गदर्शन करून या परिषदेची उंची वाढवली. या परिषदेचे उद्घाटन आयएमएचे राज्याचे नियोजित अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी हे होते तर अध्यक्षस्थानी अंबाजोगाई येथील स्वा.रा.ती. ग्रा.वै.रू. व महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे हे होते तर व्यासपीठावर स्वा.रा.ती. रुग्णालयातील डॉ. अभिमन्यू तरकसे ,आयएमएचे अंबाजोगाई अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे, आयएमएचे सांस्कृतिक विभागाचे सचिव डॉ.राजेश इंगोले, दंतरोग तज्ञ डॉ. नरेंद्र काळ आदी मान्यवर उपस्थित होते.

# फटाक्याचे आवाज काढणाऱ्या सायलेन्सवर शहरात पुन्हा कारवाई ५१ ४३ हजाराची दंडात्मक कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

शहरासह बीड जिल्ह्यामध्ये फटाक्याचे आवाज काढणाऱ्या बुलेटचे सायलेन्सर काढून त्यावर रोलर फिरवण्याचा प्रकार पाठीमागे अनेकदा जिल्हा वाहतूक शाखेच्या टीमने केला असतानाच पुन्हा एकदा बीड शहरात गुरुवार दिनांक १६ नोव्हेंबर रोजी कारवाई हाती घेण्यात आली. या कारवाईमध्ये ११ बुलेट चे सायलेन्सर काढण्यात येण्याबरोबरच ५१ केसेस करून ४३ हजार ५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला.

यासंदर्भात माहिती असे की बीड जिल्हा वाहतूक शाखेच्या वतीने वाहतूक कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व वाहन नियमाची दखल न घेणाऱ्या वाहनधारकावर गेले काही महिन्यापासून कारवाईचा सपाटा लावलेला आहे. पाठीमागील काही दिवसाखाली शहर वाहतूक शाखेचे सपोनि सुभाष सानप आणि त्यांच्या टीमने फटाक्याचे आवाज काढणाऱ्या बुलेटचे सायलेन्सर काढून त्याच्यावर रोलर फिरवण्याचे काम केले होते . याची धास्ती घेऊन कित्येक बुलेट चालकांनी असे बसविलेले सायलेन्सर देखील काढले होते. परंतु काही लोक या सदर्भात दखल घ्यायला तयार नव्हते. फटाक्याचे आवाज काढणाऱ्या बुलेटमुळे मोठ्या प्रमाणात ध्वनी प्रदूषण होत असतानाच असा आवाज निघताच लहान मुले देखील दचकण्याचे प्रकार होऊ लागले. तेव्हा सपोनी सुभाष सानप आणि त्यांच्या टीमने गुरुवार दिनांक १६ जानेवारी रोजी सायंकाळी बस स्थानकासमोर अशा बुलेटचे सायलेन्सर काढण्याची मोहीम राबवली. यात ११ बुलेटचे सायलेन्सर काढण्यात आले. तर सुमारे ५१ वाहनावर केसेस करून सुमारे ४३ हजार ५०० रुपयांचा दंड करण्यात आला



*भारतातील सर्वात तरुण विधानसभा अध्यक्ष म्हणून नावलौकिक असलेले मा.श्री राहुलजी नार्वेकर यांची आज मा. आ. सुरेश अण्णा धस, शिवसेना बीड जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक,स्वप्निल भैय्या गलधर रवींद्र गुरमे शिवसेना सह समर्कप्रमुख यांच्यासह विधान भवन येथे विविध विषयावर भेट घेतली.*

# डिजिटल रिपॉझिटरीवर आधारित माहिती सेवेचा वाचकांनी लाभ घ्यावा: आ. सतीश चव्हाण

**धारूर । प्रतिनिधीं**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयात नूतन वाचन कक्ष डिजिटल सेवा सुविधांनी युक्त आहे. आधुनिक शिक्षण प्रणालीत डिजिटल तंत्रज्ञानाच्या वापराने माहितीचा प्रसार वेगाने होऊ लागला आहे. ग्रंथालयातील नूतन वाचन कक्ष हे याचे उत्तम उदाहरण आहे. हा वाचन कक्ष डिजिटल डिपॉझिटरीवर आधारित असून, यामध्ये क्यूआर कोड तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर होत आहे. या नूतन वाचन कक्षाचे उद्घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक आणि कवी डॉ. इंद्रजीत भालेराव यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन प्रसंगी बोलताना डॉ. भालेराव म्हणाले, डिजिटल माध्यमांचा वापर केल्याने माहितीचा प्रसार अधिक सहज, वेगवान आणि परिणाम कारक होतो. या वाचन कक्षामुळे विद्यार्थ्यांना आणि वाचकांना आधुनिक साधनांचा लाभ घेता येईल. या कार्यक्रमाला मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे



सरचिटणीस आ. सतीश चव्हाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले, आजच्या काळात डिजिटल माध्यमे ही ज्ञान मिळवण्याचे प्रभावी साधन बनली आहेत. विद्यार्थ्यांनी आणि वाचकांनी या डिजिटल सुविधांचा अधिकाधिक लाभ घ्यावा आणि स्वतःला अद्ययावत ठेवावे.

नूतन वाचन कक्षात स्पर्धात्मक परीक्षांसाठी उपयुक्त असलेले ग्रंथ, संदर्भग्रंथ, तसेच इंटरनेटवर उपलब्ध असलेली ई-बुक्स, ई-जर्नल्स, ई-डॉक्युमेंट्स, शैक्षणिक व्हिडिओ आणि इतर डिजिटल संसाधने सहज उपलब्ध करून देण्यात आली आहेत.क्यूआर कोड तंत्रज्ञानाचा उपयोग करून वाचक त्यांच्या स्मार्टफोनद्वारे हवे असलेले ई-बुक्स, संदर्भ लेख, जर्नल्स आणि व्हिडिओज एका क्लिकवर पाहू किंवा डाऊनलोड करू शकतात.

# मा.मुख्यमंत्र्यांनी पालकमंत्री पदच रद्द करावे : प्रा.सुरेश नवले

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात सध्या पालकमंत्री पद हे कळीचे पद होऊन बसले आहे. कधी काळी महाराष्ट्रात पालकमंत्रीपद नव्हते, खरं तर पालकमंत्री पदाची गरजच नाही, जिल्ह्याचे पालकमंत्री जिल्ह्याचे मुख्यमंत्री समजून काम करतात. अधिकार एकवटल्यामुळे सत्तेचे केंद्रिकरण झाले आणि त्यामधून गैरप्रकार वाढीस लागले. अवैध मार्गाने वसूलीचे उद्योग सुरू झाले, टक्केवारी बोकाळली, विविध विभागांना निधी देण्याच्या मोबदल्यात टक्केवारी वसुल केल्या जाऊ लागली, हे एखादा दुसरा जिल्हा अपवाद वगळता महाराष्ट्रात सर्रास घडत आहे. उघड्या डोळ्यांनी पाहण्यापलीकडे मा.मुख्यमंत्री काहीच करू शकत नाहीत, कारण त्यांचे ते मंत्रिमंडळातील सहकारी आहेत. पालकमंत्री पद नसल्यामुळे विकासाला खिळ बसते वगैरे हे धांदात असत्य आहे. पालकमंत्री हे जिल्ह्यातील सर्व मतदारसंघांना समान न्याय देत नाहीत.

# विद्यापीठ नामविस्ताराचा लढा ही जनतेने सुरू केलेली चळवळ होती : ज्येष्ठ पत्रकार अमर हबीब

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये इतिहास विभाग, सांस्कृतिक विभाग, आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ३१ व्या विद्यापीठ नामविस्तार दिनानिमित्ताने मुक्त पत्रकार, शेतकरी पुत्र आंदोलनाचे उद्गाते अमर हबीब यांच्या व्याख्यानाचे



आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन व अभिवादन करून करण्यात आली. याप्रसंगी विचार मंचावर उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. केशव भोंडवे, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. विनायक कापावार कार्यक्रमाधिकारी डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड, डॉ. दत्ता जाधव यांबरोबरच महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ.संदीप क्षीरसागरांची नवीन संकल्पना

## प्रशासन आता मतदारसंघातील गावोगावी जाणार

**बीड । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांना शासनस्तरावरील योजनांची माहिती देण्यासाठी गावोगावी जाऊन प्रशासनाने शिबीर घ्यावेत आणि सर्वसामान्य नागरिकांना विविध योजनांची माहिती द्यावी अशी नवीन संकल्पना आ.संदीप क्षीरसागर यांनी सुचवून याबाबतचा कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार आता जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात बीड तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन प्रशासनाकडून शिबीर घेण्यात येणार आहेत. शासनाच्या योजना विविध योजना शेतकरी, दुर्बल घटक आणि सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्यासाठी अधिक प्रभावी मार्गाचा अवलंब केला जावा. या हेतूने आ.संदीप क्षीरसागर यांनी नवीन संकल्पना सूचविली. महसूल विभाग, कृषी विभाग, ग्रामविकास विभाग यांसह इतर विभागांच्या अधिकारी व कर्मचारी यांनी गावोगावी जाऊन संयुक्तरित्या शिबीर घ्यावेत. या शिबीरांमध्ये प्रत्येक घटकातील लोकांसाठी असलेल्या योजनांची त्या-त्या लोकांना देऊन त्यांना असलेल्या शंका आणि समस्यांचे निराकरण करावे. असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी तहसिलदार, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी यांना दिले होते. यावर आता तहसिलदार यांनी आदेश काढले आहेत. दि.२२ जानेवारी ते ३१ जानेवारी या काळात बीड तालुक्यातील प्रत्येक गावात असे शिबीर घेण्यात येणार आहेत.

# महारेशीम अभियान चित्ररथ जिल्ह्यात रवाना

**बीड । प्रतिनिधीं**

जिल्हा रेशिमि उद्योग कार्यालयामार्फत आयोजित महारेशीम अभियानाचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी मोकाटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपाध्यक्ष शामसुंदर पडुळे, उपस्थित होते. यावेळी रेशीम विभागाकडून तयार केलेल्या रथास निवासी उपजिल्हाधिकारी यांनी हिरवी झेंडी दाखवून रेशिम अभियानाची सुरुवात केली. हे अभियान ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ पर्यंत असून विभागाकडून गावोगावी कार्यक्रमाव्दारे रेशीम शेतीचे महत्व व अल्प पाण्यावर नगदी पीक असल्यने वर्षातुन ४ ते ५ पीके निघत असल्यने तसेच इतर पारंपारिक पिकापेक्षा जास्त उत्पन्न निघत असल्याचे शेतकरी वर्गात जनजागृती करुन करुन नोंदणी



करण्यात येते. नोंदणी केलेल्या अल्पभुधारक शेतक-यांना मनरेगा अंतर्गत ४,८,०००/- १०० टक्के अनुदान देण्यात येते.

जे लाभार्थी मनरेगा अंतर्गत नाहीत बहूभुधारक यांना विभागाकडून सिल्क समग्र योजने अंतर्गत देण्यात येते. राज्यात बीड जिल्हा रेशीम उत्पादनात प्रथम क्रमांकावर आहे जिल्हयात ५४०६ शेतकरी यामध्ये काम करत असून रेशीम उत्पादनामुळे उसतोड कामगार म्हणून ओळख असलेल्या या जिल्हयाची ओळख रेशीम उत्पादक जिल्हा म्हणून होत आहे. कृषी उत्पन्न बाजार समिती मार्फत विभागाकडून शासनमान्य कोष खोली बाजारपेठ उभारणी केली असून यामध्ये मोठया प्रमाणात कोष खरेदी (राज्यात प्रथम क्रमांकावर) केले जात आहे. सन २०२३-२४ मध्ये ११०९ मेट्रिक टन कोष शेतक-यांनी विक्री केले असून सन २०२४- २०२५ मध्ये १५ डिसेंबर २४ अखेर १०२२ मे. टन कोषाची खरेदी झाली असून सध्या कोषाचे सरासरी दर ५५०-६५० च्या प्रति क्विंटल असल्यने शेतक-यांचा कल रेशीम शेतीत वाढत चालला आहे.

